**नि.फौज केस क्र. ६४/२०२१**
**निशाणी क्र. ३४**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – ज्ञानेश्वर विठ्ठल सोनावने
वय सुमारे - ४६ वर्षे व्यवसाय - खाजगी नोकरी
राहणार – जळगांव , ता. जळगांव
जिल्हा – जळगांव

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून</u>**

मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी क्र. १ न्यायालयात हजर नाही. मी आरोपी क्र. १ याला पाहिल्यास ओळखू शकतो. मी दिनांक २२.११.२०१९ रोजी श्रीरंग किसनलाल सारडा या उंट बीडीच्या कारखान्यामध्ये गोडाऊन किपर (विक्री अधिकारी) म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी बुलढाणा जिल्हयात या संस्थे मार्फत विक्रीचे कामकाज पाहत होतो. घटना ही दिनांक २२.११.२०१९ रोजी दुपारी १.३० वाजता जीवन किराणा दुकान पिंपळगांव सराई येथील विजय तरमळे यांचे दुकानात घडली होती. मी मार्केटिंग करत असतांना मला माहिती मिळाली की, जीवन किराणा दुकान येथे बनावटी उंट बीडी विक्री होत आहे. त्यानंतर मी रायपूर पोलीस स्टेशन येथे सदर घटनेची माहिती दिली. त्यानंतर रायपूर पोलीसांना सोबत घटनास्थळी घेवून आलो. त्यानंतर मी गावातील दोन पंचनांना घेवून सदर बीडीची पाहणी केली. बीडीची पाहणी केल्यानंतर मला ती बीडी बनावटी असल्याचे निदर्शनास आले. पोलीसांनी मला तेथे पंचनामा करण्यासाठी सांगीतले. त्यावेळी दोन पंच म्हणून तेथे गणेश मुजमुले, साहेबराव यशवंत गवते हजर होते.

०२. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ तथा जप्तीपंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यास **नि.क्र. ३५** देण्यात येत आहे. घटनास्थळी १४ पुडे जप्त करण्यात आले होते. त्यातील एक पुडा मी पोलीसांना दिले व उर्वरीत पुडे माझ्याजवळ ठेवले. पोलीसांना बनावट बीडी व खरी बीडी यातील निरिक्षणासाठी मी पोलीसांना एक ख-या उंट बीडीचा पुडा आणुन दिला. पोलीसांनी तो माझ्यासमक्ष जप्त केला होता. मी बनावट उंट बीडी ही आमचे कार्यालय श्रीरंग किसनलाल सारडा, नाशिक येथे निरिक्षणासाठी पाठवले. दि.२५.११.२०१९ रोजी मला कंपनीकडून मी पाठवलेली उंट बीडी बनावटी असल्याचा अहवाल प्राप्त झाला. तो अहवाल आणि मला कंपनीने सदरचे प्रकरण दाखल करण्यासाठी अधिकार दिले होते. त्याचा वापर करुन मी रायपूर पोलीस स्टेशन येथे आरोपी विरुध्द

रिपोर्ट दिला. आता मला अभिलेखावरील अधिकारपत्र दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व आमचे व्यवस्थापक श्री राजेश तिकोटे यांची सही आहे. त्यास **नि.क्र. ३६** देण्यात येत आहे.

०३. बुलढााचा जिल्हयामध्ये उंट बीडीचे प्रसिध्द मार्केट आहे. परंतु काही लोक बनावटी उंट बीडी विक्री करुन ग्राहकांची फसवणू करतात. त्यामुळे शासनाची फसवणूक करुन कर डूपतो. त्यामुळे मी आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन रायपूर येथे रिपोर्ट दिला. आता मला अभिलेखावरील रिपोर्ट दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३७** देण्यात येत आहे. आता मला अभिलेखावरील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ३८** देण्यात येत आहे. आता फिर्यादीस ओ.पी. क्रमांक ३४/२०२५ वरील उंट बीडीचे पुडे दाखवण्यात आले. फिर्यादीने सांगितले की, त्यांचे समक्ष जप्त केलेला हाच मुद्देमाल आहे. त्यातील १४ पुडे हे बनावटी व एक पुडा खरा असल्याचे फिर्यादीने सांगीतले. त्यास एकत्रीत रित्या **मटेरीलय ऑबजेक्ट १** देण्यात येते.

०४. फिर्यादीने सांगीतले की, बनावटी बीडीचा पॅकेट व खरे बीडीचे पॅकेट यामध्ये सिलपट्टी यामध्ये अंतर आहे. तसेच पॅकेटवर असलेले उंटाचे निशाण यामध्ये तफाावत आहे. तसेच दोन्ही पॅकेटवर असलेला वैज्ञानिक ईशारा यामध्ये फरक आहे. तसेच लेबलमध्ये फरक आहे. पोलीसांनी माझे जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवले.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपी क्र. १ चे विधिज्ञ श्री एस.आर. सोनाळकर यांचेतर्फे</u>

०५. मी कथीत घटनेच्या वेळी चिखली ते रायपूर, पिंपळगांव सराई व सैलानी या ठिकाणी विक्री साठी गेलो होतो. मला कथीत घटनेबद्दल दि.२२.११.२०१९ रोजी त्यास गावातील एका पानाच्या दुकानातून माहिती मिळाली. मला त्या पानाच्या दुकानातील मालकाचे नाव सांगता येणार नाही. मी पोलीसांना मला पानाच्या दुकानातून माहिती मिळाली होती असे सांगीतले होते. विजय तरमळे यांचे किराणा दुकानाचे नाव जीवन किराणा असे आहे. मला त्या दुकानाचा लायसन क्रमांक व दुकान क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पिंपळगांव सराई या परिसरात बीडी बनवण्याचा कारखाना नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.११.२०१९ रोजी विजय तरमळे यांच्या

किराणा दुकानात घटना घडल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळी कोणतीही बनावट बीडी विक्रीचा व्यापार आढळून आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष गणेश मुजमुले आणि साहेबराव गवते हे पंच असल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.११.२०१९ चा अहवाल हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कुठलेही कारण नसतांना आरोपी विरुध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलाही घटनास्थळ तथा जप्तीपंचनामा करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असल्याप्रमाणे आरोपी क्र. १ याचे कोणतेही किराणा दुकान नाही.

उलटतपास पुर्ण.

<u>उलटतपास आरोपी क्र. २ चे विधिज्ञ श्री एस.एम. शेख यांचेतर्फे</u>

०६. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२.११.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन रायपूर येथे तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तोंडी तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दिलेल्या तोंडी तक्रारीवरुन दि.२२.११.२०१९ रोजी पो.स्टेशन रायपूर येथे आरोपी विरुध्द कोणताही गुन्हा नोंद झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.२२.११.२०१९ रोजी माझी प्रथम खबर अहवाल पोलीस स्टेशन रायपूर येथे सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी श्रीरंग किसनलाल सारडा या कंपनीचे मालक व पार्टनर यांचे संदर्भात फिर्यादी देते वेळी व चौकशी दरम्यान पोलीसांना अस्सल दस्त दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी श्रीरंग किसनलाल सारडा या कंपनीचे रजिस्ट्रेशन क्रमांक व पार्टनरचे संदर्भाने पोलीसांना दस्त दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बुलढाणा जिल्हा येथे काम करत असल्यासंबधाचे दस्तऐवज पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा बनावटी बीडी विक्री करत असल्यासबंधाने आमच्या कंपनीकडे कोणीही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुकानदार हे नेहमी वेगवेगळया दुकानदाराकडून माल खरीदी करत असतात. हे म्हणणे खरे आहे की, सामान्य माणसाला बनावटी बीडी व खरी बीडी यातला फरक कळत नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याचे दुकानात माल कुठून आला या बद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत जप्त मुद्देमाल हा घटनास्थळी सिलबंद केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माल जप्त करणे व पंचनामा करणे तसेच तो रासायनीक परिक्षणासाठी पाठवणे हे पोलीसांचे काम आहे. मी पंचांना घटनास्थळ

पंचनामा करण्यापूर्वी लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.११.२०१९ ते २५.११.२०१९ पर्यंत कथीत मुद्देमाल हा माझ्याकडे होता. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कंपनीकडून खरी बीडीचे पुडे घेवून हा व्यक्ती येत आहे या संदर्भाने पोलीसासोबत पत्र व्यवहार केला नाही.

प्रश्नः बीडी ही बनावटी आहे किंवा खरी आहे या संदर्भाने रासायनीक परिक्षण अहवाल अभिलेखावर नाही?

उत्तरः कंपनीचा अहवाल आहे.

कंपनीने तो अहवाल कशावरुन दिला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना स्वतः बनावटी बीडी बनवतांना पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, बुलढाणा जिल्हा येथे बनावटी बीडी बनवण्याचा कारखाना आढळून आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत दुकानदार हे जसा माल आला तशी विक्री करतात.

०८. हे म्हणणे खरे नाही की, मला तक्रार देण्याचा कोणताही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी श्रीरंग सारडा या कंपनीमध्ये विक्री अधिकारी असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कथीत मुद्देमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलाही अधिकारी नस्तांना खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, कथीत मुद्देमाल हा मीच आणला. मी पोलीसांना रिपोर्ट व बयाण देते वेळी बनावटी बीडीचा पॅकेट व खरे बीडीचे पॅकेट यामध्ये सिलपट्टी यामध्ये अंतर आहे, तसेच पॅकेटवर असलेले उंटाचे निशाण यामध्ये तफाावत आहे. तसेच दोन्ही पॅकेटवर असलेला वैज्ञानिक ईशारा यामध्ये फरक आहे, तसेच लेबलमध्ये फरक आहे सांगीतले होते परंतु सदरचा मजकूर पोलीसांनी माझ्या रिपोर्ट व बयाणामध्ये का नमुद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेरतपास सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

०९. फिर्यादला अभिलेखावरील दि. ३०.१०.२०१८ रोजीचे नियुक्तीपत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **आर्टिकल - अ** देण्यात येत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. २ चे विधिज्ञ श्री एस.एम. शेख यांचेतर्फे</u>**

१०. हे म्हणे खरे नाही की, कंपनीने मला किती दिवसासाठी महिण्यासाठी ठेवले हे नियुक्तीपत्रामध्ये नमूद नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.02.16 17:50:20 +0530

**( श्रीमती एस.एच. उके )**

दि. १६.०२.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली.